**MHRG140005022020**

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६७/२०२० मधील निशाणी ९७ वरील आदेश</u>

<u>( सुधिर रामदास पाटील वि. भार्गव रामदास पाटील वगैरे १४)</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तुर्तातूर्त मनाई हुकूमासाठी केलेला आहे. वादी यांनी या अर्जाद्वारे दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते १० व १३ ते १५ यांनी दावा मिळकतीबाबत कोणाही त्रयस्थाबरोबर भाडेकरार करु नये व दावा मिळकतीत त्यांचा हक्क व अधिकार निर्माण करु नये, तसेच दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ४ व १२ यांनी दावा मिळकतीबाबत नोंदणीकृत केलेला भाडेकरार दस्त क्र. १८७३/२०२१ हा दस्त वादीवर बंधनकारक नसून त्यामधील वादीच्या हिश्याला व वाटयाला येणा–या क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचा भराव करु नये, बांधकाम करु नये, त्याचे स्वरुप बदलू नये व व्यवसायाच्या दृष्टीकोनातून त्यावर कंटेनर–ट्रेलर ठेवू नये व त्यावर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करु नये असा तुतार्तुर्त ताकीद हुकूम प्रतिवादींविरुध्द व्हावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १, २, ६, ९ व १० यांनी सदर अर्जास नि.क्र. ९९ व १०१ येथे म्हणणे दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीचा अर्ज खोटा असून तो त्यांना मान्य नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे वडील व प्रतिवादी क्र. ५ चे पती रामदास गजानन पाटील यांनी सदर दावा मिळकतींबाबत मृत्युपत्र केलेले आहे. प्रतिवादींची स.नं. ५९/७ ही मिळकत रामदास पाटील यांनी हस्तांतरीत करुन त्यांचा संपुर्ण मोबदला वादीला दिला असल्याने वादीला या दावा

मिळकतीत वाटप मागणेचा हक्क व अधिकार नाही. रामदास पाटील यांनी प्रतिवादी क्र. ११ यांना लिहून दिलेले खरेदीपत्र कायदेशीर असून त्याबाबत वादीला हरकत घेणेचा हक्क नाही. दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या असल्याने त्यांनी प्रतिवादी क्र. १२ यांना लिहून दिलेले करारपत्र योग्य व कायदेशीर आहे. तसेच सदर दावा मिळकतींचा कब्जा पंधरा वर्षाकरीता त्यांनी प्रतिवादी क्र. १२ यांना दिलेला आहे. रामदास गजानन पाटील यांनी दावा मिळकतीबाबत मृत्युपत्र करुन वाटप केलेले असल्याने वादीचा दावा चालणेस पात्र नसल्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. ३ ते ५, ७ व ८ यांनी सदर अर्जास नि.क्र. २६ येथे म्हणणे दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीचा अर्ज खोटा असून तो त्यांना मान्य नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे वडील व प्रतिवादी क्र. ५ चे पती रामदास गजानन पाटील यांनी सदर दावा मिळकतींबाबत मृत्युपत्र केलेले आहे. दावा मुदतबाहय आहे. दाव्यास योग्य ती कोर्ट फी लावलेली नाही. प्रतिवादींची स.नं. ५९/७ ही मिळकत कुटूंबियांच्या गरजा भागविण्यासाठी रामदास पाटील यांनी प्रतिवादी क्र. ११ ला हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे वादीला या दावा मिळकतीत वाटप मागणेचा हक्क व अधिकार नाही. वादी याने रामदास पाटील याची समाजामध्ये बदनामी केल्याने रामदास पाटील याने दावा मिळकतीतील कोणताही भाग वादीला दिलेला नाही. दावा मिळकती एकत्र कुटूंबाच्या नाहीत. वादी यांना रामदास पाटील यांनी स.नं. ५९/७ याच्या विक्रीतून आलेली रक्कम व इतर रक्कम अशी एकुण पाच लाख वादीला दिलेली आहे. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीत हक्क नाही. रामदास पाटील यांनी प्रतिवादी क्र. ११ यांना लिहून दिलेले खरेदीपत्र कायदेशीर असून त्याबाबत वादीला हरकत घेणेचा हक्क नाही. दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या असल्याने

त्यांनी प्रतिवादी क्र. १२ यांना लिहून दिलेले करारपत्र योग्य व कायदेशीर आहे. तसेच सदर दावा मिळकतींचा कब्जा पंधरा वर्षाकरीता त्यांनी प्रतिवादी क्र. १२ यांना दिलेला आहे. रामदास गजानन पाटील यांनी दावा मिळकतीबाबत मृत्युपत्र करुन वाटप केलेले असल्याने वादीचा दावा चालणेस पात्र नसल्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र. ११ यांनी सदर अर्जास नि.क्र. ४५ येथे म्हणणे दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीला रामदास गजानन पाटील यांच्या नावाची नोंद होती. सदर मिळकती त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकती होत्या. त्यामुळे स.नं. ५९/७ ही मिळकत त्यांनी मोबदला स्वीकारुन त्यांना हस्तांतरीत केली आहे. सदर प्रतिवादीचे खरेदीपत्र दिनांक १६.०१.२०१३ रोजीचे आहे. वादीला सदरचे खरेदीपत्र माहित व मान्य होते. रामदास पाटील यांनी नजरचुकीने सदर स.नं. ५९/७ ही मिळकत मृत्युपत्रात नमुद केलेली आहे. वादीचा दावा मुदतीत नाही. प्रतिवादी क्र. ११ च्या नावाची नोंद ७/१२ दप्तरी झालेली होती. मृत्युपत्राच्या नोंदीनुसार चुकीने प्रतिवादी क्र. ११ चे नाव कमी करुन प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नाव सदर मिळकतीला लागले होते. परंतु, त्यावर प्रतिवादी क्र. ११ यांनी हरकत घेतल्यावरुन प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रतिवादी क्र. ११ यांचे नाव नोंद होण्यास ना हरकत दिलेली आहे. त्यामुळे स.नं. ५९/७ ही मिळकत प्रतिवादी क्र. ११ ची असल्याने त्याबाबत वादीला कोणतीही मागणी करता येणार नाही. सबब, वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

५. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र .१२ ते १५ यांचे विरुध्द विना म्हणणे चालवणेत आला.

६. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादींतर्फे व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. सदर मुद्दयांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदविले आहेत ते खालीलप्रमाणे :

| **अ.नं.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | वादी याने त्यास याकामी सकृतदर्शनी दावा त्यांचे बाजूने असलेचे सिध्द केले आहे काय ? | : | अंशतः होकारार्थी |
| २ | न्यायाचे समतोलत्व वादी यांच्या लाभात असल्याचे वादी यांनी सिध्द केले आहे काय ? | : | अंशतः होकारार्थी |
| ३ | अंतरीम मनाई अनुतोष न दिल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादी यांनी सिध्द केले आहे काय ? | : | अंशतः होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | : | अर्ज अंशतः मंजूर करणेत आला. |

## <u>कारणमिमांसा</u>

८. वादी यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी क्र. ४ सोबत दावा मिळकतीचे ७/१२ उता-याच्या प्रमाणित प्रती, फेरफार क्र. ८९१,११८८,१२२८ व २६७३, ३६०२ व २२१० च्या प्रती, दिनांक १६.०१.२०१३ रोजीच्या खेरदीखताची नक्कल प्रत, दिनांक १५.१०.२०१९ रोजीच्या मृत्युपत्राची सही शिक्का नक्कल प्रत, वादीचे वकीलांनी रामदास पाटील यांना पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत, रामदास

पाटील यांनी त्यांचे वकीलांमार्फत नोटीशीस पाठवलेले उत्तर, नि. ४२ सोबत दिनांक १७.६.२०२१ रोजीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत दाखल केले आहे.

९. प्रतिवादी यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी क्र. १०८ सोबत बयाणा पावती दाखल केली आहे.

**मुद्दा क्रमांक १ बाबत** –

१०. वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती या त्यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती या रामदास गजानन पाटील यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. वादीने नि.क्र. ४ सोबत दावा मिळकतींच्या ७/१२ उता–यांची, फेरफारांच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यातील नि.क्र. ४/११ वरील फेरफार क्र. ८९१ चे अवलोकन करता सकृतदर्शनी असे दिसून येते की, दावा मिळकत क्र. १ ते ८ या शंकर जानू पाटील यांच्या नंतर गजानन शंकर पाटील व बामूबाई नामा पाटील यांच्या नावे झाली. तसेच नि.क्र. ४/१२ वरील फेरफार क्र. ११८८ वर गजानन पाटील मयत झाल्याने सदर दावा मिळकत क्र. १ ते ८ या रामदास गजानन पाटील व इतर ७ यांच्या नावे झाल्या. यावरुन सदर दावा मिळकत क्र. १ ते ८ या रामदास गजानन पाटील यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे दिसून येते. तसेच दावा मिळकत क्र. १/९ व १/१० या मिळकतींचा नि.क्र. ४/९ व ४/१० येथे दाखल ७/१२ उता–यांचे अवलोकन करता सदर मिळकती या भोगवटाधारक वर्ग–२ असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. परंतु सदर मिळकती एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याबाबत सकृतदर्शनी कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर दिलेला नाही. वादीचा सदरचा दावा हा वाटपाकरीता आहे. दावा मिळकती क्र. १ ते ८ या एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. परंतु, दावा मिळकत

क्र. २ याच्या ७/१२ उता–याचे अवलोकन करता त्यावर प्रतिवादी क्र. ११ च्या नावाची नोंद दिसून येते. दावा मिळकत क्र. ९ व १० या भोगवटादार वर्ग २ ओत. त्यांचे हस्तांतरण प्रतिवादींनी पुर्व परवानगी घेतल्याबातचा कोणताही सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर आणलेला नाही. दावा मिळकत क्र. २ चा ताबा प्रतिवादी क्र. ११ कडे असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदरचे खरेदीखत हे सन २०१३ सालातील आहे. त्यामुळे त्याबाबतीत वादीला मुदत कायद्यातील तरतूदीप्रमाणे ज्ञान केव्हा झाले याबाबत पुरावा झालेशिवाय त्याबाबत वादीला सकृतदर्शनी दावा दिसून येत नाही. प्रतिवादी क्र. ११ हा दावा मिळकत क्र. २ तबदील करत असल्याबाबत सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा वादीने आणलेला नाही. त्यामुळे वादीला सदर कामी अंशतः सकृतदर्शनी दावा आहे या मतापर्यंत मी आलेलो असल्याने मी मुद्दा क्र. १ बाबत अंशतः होकारार्थी मत नोंदवले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत</u> –**

११. पुनरावृत्ती टाळणेकरीता दोन्ही मुद्दयांचे विवेचन एकत्रात घेतलेले आहे. वादीचा दावा हा वाटपाकरीता आहे. सदर अर्जाद्वारे वादी यांनी या अर्जाद्वारे दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते १० व १३ ते १५ यांनी दावा मिळकतीबाबत कोणाही त्रयस्थाबरोबर भाडेकरार करु नये व दावा मिळकतीत त्यांचा हक्क व अधिकार निर्माण करु नये अशी मागणी केलेली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र. १ ते ४ हे रामदास गजानन पाटील यांची मुले, प्रतिवादी क्र. ५ पत्नी, प्रतिवादी क्र. ६ भाउ, प्रतिवादी क्र. ७ व ८ बहीणी, प्रतिवादी क्र. ९ ते १५ ही बहीणींची मुले आहेत. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती या एकत्र कुटूंबाच्या आहेत. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती रामदास गजानन पाटील यांच्या मिळकती होत्या व त्या त्यांनी मृत्युपत्राने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या नावे केलेल्या आहेत. दावा

मिळकती या एकत्र कुटूंबाच्या आहेत किंवा कसे, रामदास पाटील यांना दावा मिळकतीबाबत मृत्युपत्र करणेचा अधिकार होता किंवा कसे हे अंतीम पुराव्याअंती ठरणार आहे. रामदास पाटील यांनी त्यांच्या हयातीत दावा मिळकत क्र. २ ही प्रतिवादी क्र. ११ ला विक्री केली आहे. परंतु, प्रतिवादी क्र. ११ च्या कथनाप्रमाणे त्याचे खरेदीपत्र सन २०१३ मधील असल्याने सदरचा दावा मुदतीत नाही. तसेच रामदास पाटील यांनी केलेल्या मृत्युपत्राच्या आधारे झालेल्या नोंदीनुसार दावा मिळकत क्र. १, ३ ते ८ या प्रतिवादी क्र. १ , ३ व ४ यांनी प्रतिवादी क्र. १२ यास पंधरा वर्षे भाडेकराराने दिलेली आहेत. सदरचा दावा हा वाटपाचा आहे. त्यामुळे दावा मिळकतींबाबत पुढील हस्तांतरण झाल्यास दावा मिळकतींचे वाटप करणे अडचणीचे ठरणार आहे. त्यामुळे न्यायाचे समतोलत्व अंशतः वादीच्या बाजूने असल्याचे माझे मत आहे. त्यामुळे दावा मिळकती क्र. १, ३ ते ८ बाबत प्रतिवादी क्र. १ ते १० व १३ ते १५ यांनी सदर आदेशापासून पुढे दाव्याचा अंतीम निकाल होईपर्यंत त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये असे आदेश देणे योग्य होईल.

१२. वादीने याकामी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ४ व १२ यांनी दावा मिळकतीबाबत नोंदणीकृत केलेला भाडेकरार दस्त क्र. १८७३/२०२१ हा दस्त वादीवर बंधनकारक नसून त्यामधील वादीच्या हिश्याला व वाटयाला येणा–या क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचा भराव करु नये, बांधकाम करु नये, त्याचे स्वरुप बदलू नये व व्यवसायाच्या दृष्टीकोनातून त्यावर कंटेनर–ट्रेलर ठेवू नये व त्यावर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करु नये असा तुतार्तुर्त ताकीद हुकूम प्रतिवादींविरुध्द व्हावा अशी विनंती केली आहे. परंतु उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता सकृतदर्शनी असे दिसून येते की, सदरचा भाडेकरार हा नोंदणीकृत आहे. तसेच रामदास गजानन पाटील यांनी केलेले मृत्युपत्र देखिल नोंदणीकृत आहे. त्यामुळे

प्रतिवादी क्र. १२ याचा हक्क मोबदल्याने दावा मिळकत क्र. १, ३ ते ८ मध्ये निर्माण झाला आहे. सदर दावा मिळकतीबाबत मृत्युपत्र करण्याचा रामदास पाटील यांना हक्क होता किंवा कसे, त्यांचे मृत्युपत्र कायदेशीर आहे किंवा कसे हे पुराव्याअंती ठरणार आहे. प्रतिवादींच्या वकीलांच्या युक्तीवादा दरम्यान वादीला स.नं. ५९/७ या मिळकतीचा मोबदला मिळाल्याने त्याला रामदास पाटील यांच्या मिळकतीतून हिस्सा मिळाला आहे असे कथन आले आहे. परंतु सदर बाब ही पुराव्याअंती शाबित होणार आहे. त्यामुळे सर्व बाबींचा विचार हा पुराव्याअंतीच करणे योग्य होईल. तसेच वादीने दावा मिळकतींपैकी त्याच्या हिश्याला व वाटयाला येणा–या क्षेत्रावर प्रतिवादी क्र. १ ते ४ व १२ यांनी व्यवसाय करु नये अशी मागणी केली आहे. दावा मिळकतींपैकी वादीला किती क्षेत्र येते याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. वादीला दावा मिळकतीत हक्क आहे, हिस्सा आहे व त्याचे प्रमाण हे पुराव्याअंती ठरणार आहे. पण त्याकरीता प्रतिवादी क्र. १२ याच्यावर निर्बंध लावणे योग्य होणार नाही. प्रतिवादी क्र. १२ हा दावा मिळकतीचा मालक नाही. सबब, वादीची ही दाद मंजूर करता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते १० व १३ ते १५ यांनी दावा मिळकतीत यापुढे त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण केल्यास दाव्याचा निकाल करणे अडचणीचे होणार आहे. सबब, त्याकरीता वादीचे अंशतः नुकसान होणार आहे या मतापर्यंत मी आलेला आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ व ३ बाबत अंशतः होकारार्थी मत नोंदवले आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत –**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत अंशतः होकारार्थी मत नोंदवत मुद्दा क्र. ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश करीत आहेत.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | दावा मिळकत क्र. १, ३ ते ८ बाबत प्रतिवादी क्र. १ ते १० व १३ ते १५ यांनी सदर आदेशापासून सदर दाव्याचा अंतीम निकाल होईपर्यंत त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत येत आहे. |
| ३. | खर्चाबाबत आदेश नाहीत. |

उरण , (एन.एम.वाली)

दिनांक ३०.०९.२०२३ प्रभारी दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर उरण